**पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवरील विधी अधिकारी 'गट-अ' यांची खालील पदे कंत्राटी पध्दतीने नियुक्तीसाठी विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.**

---

**जाहिरात क्र. पोमसं/२-अ/३२२८/विअ/भरती/२०१२-१३** **मुंबई, दिनांक :-** ८ **/०१/२०१३**

**पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवरील खाली दर्शविलेल्या ठिकाणी विधी अधिकारी 'गट-अ' यांची पदे ११ महिने कंत्राट पध्दतीने भरावयाची आहेत.**

**विधी अधिकारी 'गट - अ' (एकूण ०३ पदे)**

| **अ.क्र.** | **कार्यालयाचे नाव** | **मंजूर पदे** |
|---|---|---|
| ०१ | अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, मुंबई | १ |
| ०२ | अपर पोलीस महासंचालक, नागरी हक्क संरक्षण, मुंबई | १ |
| ०३ | अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, मुंबई | १ |
| | **एकूण** | **३** |

उमेदवाराने सोबत दिलेल्या विहित नमून्यातील अर्ज लिफाफ्यात घालून लिफाफ्यावर उजव्या बाजूला ठळक अक्षरात **विधी अधिकारी 'गट-अ' च्या पदासाठी अर्ज** असे नमूद करून दि.२१/०१/२०१३ पर्यंत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४००००१, [(लक्षवेध :- कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. २-अ)] या पत्त्यावर पोहचेल याची दक्षता घ्यावी. **दि.२१/०१/२०१३ नंतर या कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.** अर्जासोबत पत्रव्यवहाराकरीता उमेदवाराचा पत्ता असलेले दोन लिफाफे जोडावेत.

* **टिप :-** वर दर्शविलेल्या पदसंख्येत/ नियुक्तीच्या ठिकाणात बदल होण्याची शक्यता असू शकते. त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार हे सक्षम प्राधिका-यास राहतील.

➢ **करारातील मासिक देय रक्कम :-**

**अ)** विधी अधिकारी 'गट-अ' पदाकरिता करारातील मासिक देय रक्कम रू. २०,०००/- + दुरध्वनी व प्रवास खर्च रू. ५,०००/- असे एकूण रू. २५,०००/- दरमहा देय राहील (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा ) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

➢ **शैक्षणिक अर्हता व वयोमर्यादा अनुभव :-**

१. **शेक्षणिक अर्हता :-** उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कायद्याचा पदवीधर असेल. तो सनदधारक असेल

२. **वयोमर्यादा :-**

**अ)** विधी अधिकारी 'गट-अ' या पदासाठी उमेदवाराचे वय दि. ३१/०१/२०१३ रोजी ६२ वर्षापेक्षा जास्त नसेल.

किंवा

३. जी व्यक्ती शासकीय सेवेत असतांना प्रत्यक्षपणे विधीविषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी प्रशासकीय व सेवाविषयक कायद्यांविषयक सखोल ज्ञान असेल त्याचप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापित समकालीन कायद्याचे ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकीय सेवा ही केवळ अनुभवासाठी ग्राह्य धरण्यात येईल. सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागू राहतील. शासकीय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.

४. **अनुभव :-**

**अ)** विधी अधिकारी 'गट-अ' या पदासाठी वकीली व्यवसायाचा किमान ७ वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.

**ब)** उमेदवारास गुन्हेगारी विषयक, सेवाविषयक प्रशासनिय अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशा इ. बाबतीत ज्ञान संपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.

**क)** उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असेल.

➢ **कर्तव्ये व जबाबदा-या :-**

१. कार्यालयाकडे प्राप्त होणा-या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत/ न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

२. सेवाविषयक/ प्रशासकीय बाबी/ विभागीय चौकशा तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

३. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकिलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्रे संबंधित अधिका-यांच्या मदतीने तयार करणे.

४. शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिका-याची मान्यता घेऊन न्यायालयात विहित मुदतीत सादर होईल हे पाहणे.

५. जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करून तदनुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

६. अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करून तो संबंधित सरकारी वकिलाकडे पाठविणे व अपिलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.

७. विधीविषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नमूद दिलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे.

८. पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.

➢ **अटी व शर्ती :-**

१. मा. सर्वोच्च न्यायालया समक्ष न्यायप्रविष्ठ असलेल्या विशेष हक्क याचिका (Civil) क्र. CC 19008-19009/2012, महाराष्ट्र शासन आणि इतर विरूध्द अनिता आणि इतर तसेच (Civil) क्र. CC 20182/2012, नारायण तुकारामपंत जोशी आणि इतर विरूध्द महाराष्ट्र शासन आणि इतर मधील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून सदरील कंत्राटी पध्दतीने नियुक्तीची कार्यवाही करण्यात येत आहे.

२. सदर पदांची नेमणूक ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल. उमेदवाराला शासकीय कर्मचारी / अधिकारी म्हणून गणले जाणार नाही.

३. सदर नेमणूका या करार पध्दतीने प्रथमत: ११ महिन्यासाठी करण्यात येतील. ११ महिन्यांनंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी (जास्तीत जास्त ३ वेळा, ११ महिन्यांकरिता) वाढविता येईल. ३ वेळा मुदतवाढ दिल्यानंतरही अशा उमेदवाराची पुनश्च: नियुक्ती करणे आवश्यक आहे असे, सक्षम प्राधिका-याचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुनश्च: निवड प्रक्रियेला सामोरे जावे लागेल.

४. निवड केलेला उमेदवार ११ महिन्यांच्या कराराच्या कालावधीत वकिली व्यवसायाशी संबंधित कोणत्याही प्रकारचे खाजगी काम / व्यवसाय नियुक्ती प्राधिका-याच्या लेखी परवानगी शिवाय करू शकणार नाही. जर नियुक्ती प्राधिका-यांने सदर बाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावरही उमेदवाराने खाजगी व्यवसाय सुरू ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल. अशा उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

५. उमेदवाराची निवड मुलाखतीद्वारे करण्यात येईल. मुलाखतीचा दिनांक उमेदवारांना नंतर कळविण्यात येईल.

६. उमेदवाराला कोणताही प्रवासखर्च देण्यात येणार नाही.

७. नियुक्त केलेल्या उमेदवारास या कार्यालयामार्फत देण्यात येणारा करारनामा (Agreement) भरणे अनिवार्य राहील.

८. करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणा-या अधिकारी/ कर्मचा-यांना एकत्रित वेतन आणि अनुज्ञेय दुरध्वनी व प्रवास खर्चाव्यतिरिक्त (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा ) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

९. उमेदवारांनी वर विहित केलेल्या शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व अनुभव या अटी दि. ३१/०१/२०१३ पर्यंत पुर्ण करणे आवश्यक आहे.

१०. अर्जासोबत २.५ से.मी.X २.५ से.मी. आकाराचे सध्याचे काढलेले २ रंगीत फोटो जोडावेत.

# अर्जाचा नमूना

विधी अधिकारी 'गट-अ' * पदाकरिता अर्ज

| एका फोटोवर स्वाक्षरी करून या जागी चिकटवावा व दुसरा फोटो स्वाक्षरी करून अर्जासोबत लिफाप्यात जोडावा. |
|---|

| कार्यालयीन उपयोगासाठी |
|---|
| **1. अर्ज क्रमांक :** ☐☐☐☐☐☐☐ |
| **2. अर्ज स्विकारल्याचा दिनांक :** ☐☐ ☐☐ ☐☐☐☐ |
| **3. अर्ज स्विकारणा-याची स्वाक्षरी (दिनांकासह) :** ____________ |

---

**सूचना :** अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावेत.

# अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणची माहिती फक्त इंग्रजीत लिहावी.

* आवश्यक नसेल तेथे खोडावे.

## अ) अर्जदाराची वैयक्तीक माहिती :

1. **अर्जदाराचे संपूर्ण नांव :** आडनांव नांव वडीलांचे / पतीचे नांव

   मराठीत :____________________________________________

   # इंग्रजीत : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

2. **पत्रव्यवहाराचा पत्ता :**____________________________________________

   तालुका :______________ जिल्हा :______________ पीन कोड : ☐☐☐ ☐☐☐

3. **कायमचा पत्ता :** ____________________________________________

   तालुका :______________ जिल्हा :______________ पीन कोड : ☐☐☐ ☐☐☐

4. **दूरध्वनी क्रमांक -** लॅन्डलाईन ________________ मोबाईल क्रमांक :________________

4A. **ई-मेल :** ______________________________

5. **जन्मदिनांक :** ☐☐ ☐☐ ☐☐☐☐ जन्म स्थळ :____________________

6. दिनांक ३१/०१/२०१३ रोजीचे वय : ☐☐ ☐☐ ☐☐☐☐

   दिवस महिना वर्ष

7. लिंग : पुरूष ☐ / महिला ☐
8. धर्म : ________________ जात : ____________________
9. महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात का ? होय ☐ / नाही ☐

☼ **योग्य असेल त्या ठिकाणी ( √ ) अशी खूण करावी.**

## ब) अर्जदाराची शैक्षणिक माहिती :

**10. शैक्षणिक अर्हता :**

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नांव (विद्यालय/ महाविद्यालय) | बोर्ड / विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दि. | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ. १०वी) अथवा जूनी ११ वी परिक्षा. | | | | | |
| २. उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ. १२ वी.) | | | | | |
| ३. पदवी | | | | | |
| ४. विधी पदवी | | | | | |

11. इतर शैक्षणिक अर्हता :

संगणक प्रशिक्षीत आहे काय ? : होय ☐ / नाही ☐

12. अर्जदाराची इतर माहिती.

अ) सनद घेतल्याचा दिनांक

ब) उमेदवाराने स्वत: हाताळलेल्या केसेसचा तपशील :

| अ.क्र. | न्यायालयाचे नांव | केसेसचा प्रकार | केसेसच्या संख्या |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |

* टिप : वकीली व्यवसायाचे अनुभवाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

13-अ अर्जदारावर यापूर्वी कोणत्याही अपराधाबाबत कधीही अटक करण्यात / स्थानबध्द करण्यात/ बध्द करण्यात/ दंड करण्यात/ सिध्दोषी ठरवण्यात आले आहे काय, किंवा लोकसेवा आयोगाकडून त्यांच्या परीक्षांना/ निवडींना बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय, किंवा अनर्ह ठरविण्यात आले आहे काय, किंवा कोणत्याही विद्यापीठाकडून किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणाकडून / संस्थेकडून कोणत्याही परिक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय/ काढून टाकण्यात आले आहे काय ? होय ☐ नाही ☐

13-ब हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात, विद्यापीठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणात / संस्थेत उमेदवाराविरूध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय ? होय ☐ नाही ☐

(13-अ किंवा 13-ब चे उत्तर होय असेल तर हा अर्ज भरतांना सदर खटला, अटक, स्थानबध्दती, दंड, दोषसिध्दी, शिक्षादेश इत्यीदीचा संपूर्ण तपशील आणि न्यायालय / विद्यापीठ / शैक्षणिक प्राधिकरणात इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे स्वरूप स्पष्ट करावे.

** ** **

# अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र.

मी श्री./सौ./कु.______________________________________________याद्वारे प्रतिज्ञापुर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणिवपुर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमूद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड / नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पुर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील व त्याबाबतीत माझ्याविरूध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच मी भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

ठिकाण :

दिनांक :

अर्जदाराची सही
(दिनांकासह)

**सोबत : अर्जात नमूद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती.**